# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 03 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यात मनपा निवडणुकांच्या लढतींचं चित्र स्पष्ट;उमेदवारांना आज चिन्ह वाटप
- शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीला सरकारचं प्राधान्य–केंद्रीय कृषी मंत्र्यांचं प्रतिपादन
- मराठी साहित्याचं भवितव्य उज्ज्वल–९९व्या साहित्य संमेलनाच्या उद्घाटान सोहळ्यात अध्यक्ष विश्वास पाटील यांचं प्रतिपादन
- शालेय शिक्षणात फक्त मराठी भाषाच अनिवार्य असल्याचं मुख्यमंत्र्यांकडून स्पष्ट

आणि

- मराठी विज्ञान परिषदेचे जीवन गौरव पुरस्कार जाहीर

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत काल संपली, त्यानंतर लढतींचं चित्र काल स्पष्ट झालं.  अनेक ठिकाणी उमेदवारांना प्रतिस्पर्धी नसल्याने त्यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. काही ठिकाणी मुळातच एकमेव अर्ज आले होते, तर काही ठिकाणी छाननीत इतर अर्ज बाद झाल्यानं तिथले एकमेव पात्र उमेदवार बिनविरोध निवडून येणं निश्चित झालं आहे.

जळगाव मनपा निवडणुकीत महायुतीच्या १२ जागा बिनविरोध झाल्या आहेत. यामध्ये भारतीय जनता पक्ष तसंच शिवसेनेच्या प्रत्येकी सहा जागांचा समावेश आहे. उर्वरित ६३ जागांसाठी आता निवडणूक होणार आहे.

नांदेड मनपा निवडणुकीतून ३७६ उमेदवारांनी माघार घेतली आहे. आता ८१ जागांसाठी ४९१ उमेदवार रिंगणात शिल्लक आहेत.

जालना मनपा निवडणुकीत ४०७ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे सोळा प्रभागात एकूण ४४९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. महायुती तुटल्यामुळे अनेक ठिकाणी दुरंगी, तिरंगी लढती होण्याची शक्यता आमच्या वार्ताहरानं वर्तवली आहे.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवशी २६८ उमेदवारांनी माघार घेतली. त्यामुळे १८ प्रभागात ३५९ उमेदवार निवडणूक रिंगणात कायम राहिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत बहुरंगी लढत होणार हे आता स्पष्ट झालं आहे. कालपर्यंत एकूण ५५४ उमेदवारांनी माघार घेतली, त्यामुळे आता २९ प्रभागातल्या ११५ जागांसाठी ८५९ उमेदवार रिंगणात राहिले आहेत.

दरम्यान, मनपा निवडणुकीत आज उमेदवारांना निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर चिन्हांसह अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांची निवडणूक फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोग या निवडणुकीचं वेळापत्रक पुढच्या आठवड्यात जाहीर करण्याची शक्यता आहे. या संदर्भात या जिल्ह्यांमधल्या अधिकाऱ्यांची बैठक येत्या मंगळवारी सहा तारखेला होणार असून यावेळी निवडणुकीच्या तयारीबद्दल विशेष आढावा घेतला जाईल. या निवडणुकीसाठी नवीन मतदान यंत्रांची गरज असून १५ जानेवारीनंतर या यंत्रांचा पुरवठा अपेक्षित असल्याचं आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

****

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. सपकाळ यांनी याबाबत राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांना पत्र पाठवलं आहे. नार्वेकर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना अर्ज दाखल करतांना कथित धमकावल्याचा प्रकार अत्यंत गंभीर असून, नार्वेकर यांचं वर्तन आदर्श आचारसंहिता भंग करणारे असल्याचं, सपकाळ यांनी या पत्रात म्हटलं आहे.

****

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्याला केंद्र सरकार प्राधान्य देत असल्याचं, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. काल नाशिक इथं शेतकऱ्यांशी संवाद साधतांना चौहान म्हणाले....

**बाईट– केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान**

कृषी क्षेत्राला बळकट करण्यासाठी सरकार आवश्यक ते सर्व प्रयत्न करत असून, शेतकरी कल्याणासाठी विविध योजना राबवल्या जात असल्याचं चौहान यांनी सांगितलं

****

नवीन वर्षात देशात ४ नवे सेमिकंडक्टर उत्पादन प्रकल्प सुरु होत असल्याची घोषणा इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. ते काल नवी दिल्लीत एका कार्यक्रमात बोलत होते.

दरम्यान, मुंबई – अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी पालघर जिल्ह्यातल्या दुसऱ्या बोगद्याचं खोदकाम  काल पूर्ण झालं. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमात दूरदृष्य प्रणालीने सहभागी झाले. हा  दीड किलोमीटर लांबीचा बोगदा विरार ते बोईसर स्थानकांदरम्यान खोदण्यात आला आहे.

****

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांच्या घराच्या छतावर १ किलोवॅट क्षमतेचे सौरऊर्जा संयंत्र बसवण्याच्या कामास मान्यता देण्यात आली आहे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी ही माहिती दिली. केंद्र शासनाच्या अनुदानाव्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त १५ हजार रुपये अनुदान देण्यासही शासनाने मंजुरी दिली आहे. याबाबतचा अधिकृत शासन आदेश नुकताच निर्गमित झाला आहे.

****

समृद्ध ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या मराठी साहित्याचं भवितव्य उज्ज्वल आहे, असा विश्वास ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी व्यक्त केला आहे. सातारा इथं आयोजित या संमेलनाचं काल ज्येष्ठ हिंदी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. मावळत्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांच्याकडून विश्वास पाटील यांनी संमेलनाच्या

अध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारली. त्यानंतर केलेल्या भाषणात बोलतांना पाटील यांनी, शेतकरी आत्महत्येचा मुद्दा उपस्थित करत, लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांसाठी विशेष योजना सुरू करण्याचं आवाहन केलं. ते म्हणाले...

**बाईट – साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील**

डॉ गर्ग यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात बोलतांना दलित साहित्य हा मराठी साहित्यविश्वाचा आत्मा असल्याची भावना व्यक्त केली. डॉ भवाळकर यांनी आपल्या भाषणात पहिलीपासून हिंदी किंवा अन्य भारतीय भाषा शिकवण्याच्या निर्णयाला साहित्यिक जगताचा विरोध असल्याची भूमिका मांडली,

मराठी साहित्य महामंडळाचे सचिव मिलिंद जोशी यांनी, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीला पुरेसा निधी मिळावा अशी मागणी मांडली.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलेल्या भाषणांत राज्यात शालेय शिक्षणात मराठी हीच अनिवार्य भाषा राहील, असं स्पष्ट केलं. शालेय शिक्षणात इतर भारतीय भाषा ऐच्छिक स्वरूपात असतील, आणि त्या कोणत्या इयत्तेपासून सुरू करायच्या याबाबतचा निर्णय डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर घेतला जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सर्व विचारांना सामावून घेण्याची मराठी साहित्याने जपलेली परंपरा अत्यंत महत्त्वाची असल्याचं मुख्यमंत्र्यांनी नमूद केलं. ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दरम्यान या संमेलनात आज कथाकथन, तसंच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कवयित्री अनुराधा पाटील यांचा बालकुमार वाचकांशी संवाद, तसंच अमोल पालेकर यांच्या ऐवज या पुस्तकावर पुस्तक चर्चा होणार आहे. मराठी समाजाची विचारभ्रष्टता मराठी साहित्यात भयकथा, स्त्री चळवळीची ५० वर्षे, अभिजात दर्जा नंतरची मराठी आदी विषयांवर परिसंवाद होणार असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ लेखक, प्रकाशकांचे सत्कार होणार आहेत.

****

मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिले जाणारे जीवन गौरव पुरस्कार काल जाहीर झाले. त्यात डॉ. अनिल काकोडकर जीवनगौरव पुरस्कारासाठी क्षेपणास्त्र क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डॉ. टेसी थॉमस यांची, तर लस संशोधन कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. गगनदीप कांग यांची, डॉ. रा. वि. साठे जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

प्रत्येकी २ लाख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. आज मुंबईत आयसीटी, अर्थात रसायन तंत्रज्ञान संस्थेत हा पुरस्कार प्रदान समारंभ होणार आहे.

****

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या भरती प्रक्रियेत वयोमर्यादा वाढवून दिलासा द्यावा, अशी मागणी काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

****

राज्यात काल सर्वात कमी नऊ पूर्णांक दोन दशांश सेल्सियस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल अहिल्यानगर इथं १२ पूर्णांक तीन तर धाराशिव इथं सुमारे साडे बारा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

****